स्थानकीय पूर्वीचा अनुशेष व चालू आरक्षण विचारात घ्यावे.

२] बढतीसाठी उपलब्ध असलेल्या अमागासवर्गीय व मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना बढती देताना नियमानुसार बढतीचे प्रदेही बढतीच्या पदांची संख्या मागासवर्गीयांचा अनुशेष व आरक्षण मिळून ५०% पेक्षा जास्त होणार नाहीत.

३] मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना बढती देताना प्रथम शिल्लक अनुशेषाचा विचार व्हावा व नंतर मागासवर्गीयांसाठी पदे रिक्त असल्यास आरक्षणामधील पदे भरण्याची कार्यवाही करावी.

४] नियमित बढती देण्यासाठी अनुशेष व आरक्षणानुसार मागासवर्गीय कर्मचारी उपलब्ध नसल्यास ते उपलब्ध होईपर्यंत त्यांच्यासाठी आरक्षित असलेल्या पदावर अमागासवर्गीय कर्मचाऱ्यांना केवळ तात्पुरत्या बढत्या देण्यात याव्यात. कोणत्याही परिस्थितीत मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेली पदे अमागासवर्गीय कर्मचाऱ्यांना नियमित बढती देऊन भरली जाऊ नयेत. अमागासवर्गीयांना अशा-प्रकारे तात्पुरत्या बढत्या देतांना बढतीच्या आदेशामध्ये त्यांना देण्यात आलेल्या बढत्या तात्पुरत्या स्वरूपाच्या असून मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा पुढील आदेश होईपर्यंत चालू राहतील असे स्पष्ट नमूद करावे.

वरील सूचनांची नोंद घेऊन काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

उप महा व्यवस्थापक [क. व औ. सं.]

वित्तीय सल्लागार/मुख्य लेखा अधिकारी/उप महा व्यवस्थापक [प्र. अ.]/
उप महा व्यवस्थापक [वाहतूक]/उप महा व्यवस्थापक (नियोजन)/
उप महा व्यवस्थापक [अ. व क्ष.]/मुख्य स्थापत्य अभियंता/मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/सचिव, महामंडळ/मुख्य कामगार अधिकारी/विधी सल्लागार/
मुख्य सांख्यिकी/जनसंपर्क अधिकारी/अध्यक्षांचे स्वीय सचिव/उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे सचिव/मुख्य अंतर्गत लेखापरीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी [रा. प.]
मागारेचो मुख्य वैद्यकीय अधिकारी/संयुक्त मुख्य वैद्यकीय अधिकारी/निवासी लेखा-परीक्षा अधिकारी/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी [मुख्यालय], कर्मचारीवर्ग अधि-पर्यवेक्षक, (तृतीयवर्ग राजपत्रित पदे), उप शाखा, कर्मचारीवर्ग यांचे.

२२.१.९५

उप महा व्यवस्थापक [क. व औ. सं.]

प्रसो/२७९६५.